# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक २८/११/2020 (शनिवार)

---

## जबरी चोरी

१) पोलीस ठाणे कळमेश्वर :— अंतर्गत फिर्यादी सचिन नत्थुजी गजभिये, वय ३३ वर्ष, रा. नारी रोड, नागपूर हे त्यांचा साथीदार पुष्कर राजपूत याचेसह दिनांक २७/११/२०२० चे २२.४५ वा. ते २८/११/२०२० चे ०३.२४ वा. दरम्यान मौजा येरला येथुन आपले ट्रकमध्ये पोल्ट्री फीड लोड करुन कळमेश्वर एम.आय.डी.सी. परिसरातील मारोती धरमकाट्यावर वजन करण्याकरिता गेले. वजन करुन कळमेश्वर बायपास रोडने येरला येथे परत जाण्याकरिता निघाले असता रस्त्यात ब्रेकर आल्याने ट्रकची गती कमी करताच २२ ते २५ वयोगटातील चार अज्ञात इसमांनी ट्रक समोर दोन मोटार सायकल आडव्या केल्या आणि फिर्यादी आणि त्यांचा साथीदार यांना ट्रकचे बाहेर ओढून हातबुक्यांनी मारहान करीत फिर्यादी यांचेकडुन नगदी ७,८००/— रु., पंजाब नॅशनल बॅंकेचे एटीएम कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स तसेच साथीदार पुष्कर राजपूत यांचेकडुन नगदी ५,०००/— रु., ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन किं. १०,०००/— रु. असा एकुण २२,८००/— रु. चा मुद्देमाल जबरीने हिसकावुन नेला. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमेश्वर येथे कलम ३९२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री खडसे हे करीत असुन अज्ञात आरोपींचा शोध सुरु आहे.

## लग्नाचे आमिष दाखवुन शारीरिक संबंध प्रस्थापित करुन महिलेची फसवणुक

१) पोलीस ठाणे बुटीबोरी :— अंतर्गत वर्ष २०१७ ते १०/०८/२०२० या कालावधीत अक्षय रामभाऊ आगलावे, वय २६ वर्षे, रा. वाकेश्वर, ह.मु. बुटीबोरी याने स्थानिक फिर्यादी महिलेशी प्रेमसंबंध जोडले. लग्नाचे आमिष दाखवुन विश्वासात घेतले आणि वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. फिर्यादी महिलेचे लग्न झाले असता तिचे नातेवाईकांना त्यांचे संबंधांबाबत फोन करुन माहिती देवून महिलेस पुन्हा लग्नाचे आमिष दाखवुन घटस्फोट घेण्यास प्रवृत्त केले. फिर्यादी महिलेने घटस्फोट घेतल्यानंतर लग्नास नकार देवून दुसऱ्याच मुलीशी साक्षगंध करुन फिर्यादी महिलेची फसवणुक केली. सदर प्रकरणी फिर्यादी महिलेच्या तक्रारीवरुन अक्षय रामभाऊ आगलावे, रा. बुटीबोरी यास अटक करुन त्याचेविरुद्ध पोलीस ठाणे बुटीबोरी येथे कलम ३७६(२), (एन), ४२० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस निरीक्षक श्री चौधरी हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीस फुस लावून पळवुन नेले

१) पोलीस ठाणे कळमेश्वर :— अंतर्गत दिनांक २७/११/२०२० चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी कळमेश्वर येथे त्यांचे नातेवाईकांकडे शिक्षण घेत असता आकाश जनार्दन श्रीखंडे, वय २१ वर्षे, रा. पिपळा (किनखेडे) याने अल्पवयीन मुलीच्या अज्ञातपणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळवुन नेले. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमेश्वर येथे आकाश जनार्दन श्रीखंडे, रा. पिपळा (किनखेडे) याचेविरुद्ध कलम ३६३ भादंवी अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री नरेश नारनवरे हे करीत असुन अल्पवयीन मुलगी व आरोपीचा शोध सुरु आहे.

## चोरी

१) पोलीस ठाणे सावनेर :— अंतर्गत दिनांक २६/११/२०२० चे २०.३० वा. दरम्यान मौजा बोरुजवाडा येथिल फिर्यादी नामे सुभाष बाळकृष्ण पुसदकर यांनी आपली हिरो होन्डा मोटार सायकल क्र. एमएच ४०/एस आर ९८३५ किंमत १०,०००/— ही घराचे अंगणात उभी करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेली. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुद्ध कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री नांदुरकर हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

## अपघातात मृत्यु

१) पोलीस ठाणे वेलतूर :— अंतर्गत दिनांक २७/११/२०२० चे २०.०० वा. दरम्यान सचिन मधुकर रामटेके, वय २८ वर्षे, रा. पिंपरी मुंजे पूनर्वसन, ता. कुही आपले मोटार सायकलने पचखेडी येथे जात असता मौजा बोथली शिवारात विरुद्ध दिशेने येत असलेल्या अज्ञात वाहन चालकाने आपले वाहन निष्काळजीपणे भरधाव वेगाने चालवुन त्यांचे मोटार सायकलला धडक मारल्याने गंभीर जखमी होवुन मरण पावले. सदर प्रकरणी मधुकर मणीराम रामटेके, वय ५८ वर्षे, रा. पिपरी मुंजे पुनर्वसन यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे वेलतूर येथे कलम २७९, ३०४ (अ) भादंवि सहकलम १३४(अ)(ब), १८७, १८४ मोवाका अन्वये अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री वैरागडे हे करीत असुन अज्ञात वाहन चालकाचा शोध सुरु आहे.

## गळफास लावुन आत्महत्या

१) पोलीस ठाणे उमरेड :- अंतर्गत मौजा चारगाव (मुंगलाई) येथिल अमोल शेषराव मानकर, वय २४ वर्षे यांचे स्थानिक एका मुलीशी प्रेमसंबंध होते. परंतु कौटूंबिक कारणाने सदर मुलीशी त्यांचे लग्न होवू शकले नाही. त्यानंतर दुसऱ्या मुलीशी लग्न जोडून साक्षगंध केले आणि लग्नाची तारीख काढली. परंतु लग्न जुडलेल्या मुलीला अमोल मानकर यांच्या जुन्या प्रेमसंबंधांबाबत माहिती मिळाल्याने लग्न तुटण्याच्या भितीने दिनांक २७/११/२०२० चे सकाळी ०४.०० वा. दरम्यान सिलिंग फॅनचे हुकला दोरीने बांधुन गळफास लावुन आत्महत्या केली. सदर प्रकरणी शेषराव संपत मानकर, रा. चारगाव (मुंगलाई) यांचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे उमरेड येथे अकस्मिक मृत्युची नोंद करण्यात आली असुन पोलीस हवालदार अजित ठाकुर हे तपास करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
जिल्हा नागपूर (ग्रामीण), नागपूर.